Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

२३ /२०२६

**विषय: विद्यापीठ परिसर क्षेत्रात जाहिरात होर्डिंग उभा करण्यास प्रतिबंध करण्याबाबत.**

विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभाग, अध्यासन व प्रशाला यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरात विविध संस्था/व्यक्तींकडून जाहिरात होर्डिंग उभे करण्याबाबत विचारणा होत असते. या अनुषंगाने विद्यापीठ ही एक शैक्षणिक संस्था असून विद्यापीठ परिसराचे नैसर्गिक सौंदर्य जपण्यासाठी आणि शिस्त राखण्यासाठी अधिकार मंडळाने ***"शिवाजी विद्यापीठ परिसरात कोणत्याही प्रकारचे जाहिरात होर्डिंग उभा करण्यात येऊ नये."*** असा निर्णय घेतला आहे.

सबब, सदर निर्णयाच्या अनुषंगाने सर्व अधिविभाग प्रमुख, प्रशासकीय विभाग प्रमुख आणि संबंधित अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठ परिसराच्या कोणत्याही भागात (प्रवेशद्वार, रस्ते, मोकळ्या जागा किंवा इमारतींचे छत, इ.) कोणत्याही खाजगी किंवा व्यावसायिक जाहिरातींचे होर्डिंग उभा करण्यास परवानगी देण्यात येऊ नये. सदर निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जा. क्र. आस्थापना / 526

दि. 20 APR 2026

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र.-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, सर्व संचालक यांचे कार्यालय

२) सर्व अधिविभागप्रमुख, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक

३) इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी व विद्यार्थींनी यांचे निदर्शनास आणावे.**